# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR


## Continuous 18 Hour Study - 2018-19

### Bharatratna Dr.Babasaheb Ambedkar birth anniversary -2019

The ambitious event: “Only One obsession – 18 Hours Study” (*Ekach Dhyas, 18 Tas Abhyas*) Inauguration by Hon. Principal Dr. Shriram Solanke on 12/04/2019. This Event was organized with the view to raise the stamina of students to study for long hours. On the day students starts studying in the library reading room at 5:00 AM and ends at 11:00 PM. Students read novels, biography, autobiography and other general study material. Total 111 students participated in this event. The college provides tea, breakfast in the morning, lunch in the afternoon and fruits in the evening.





दयानंद शिक्षण संस्था संचलित-

दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

ग्रंथालय विभाग

आयोजित

एकच ध्यास १८ तास अभ्यास

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/कु........................................................................................

वर्ग ............................याने/हिने दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त “एकच ध्यास १८ तास अभ्यास” या उपक्रमामध्ये शुक्रवार दि. १२.०४.२०१९ रोजी पहाटे ५.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत सलग अभ्यास करून यशस्वी सहभाग नोंदविला.

सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ग्रंथपाल प्राचार्य

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## Continuous 18 Hour Study - 2018-19

अभिप्राय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपल्या विद्यार्थीप्रिय दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी अठरा तास अभ्यासाचा उपक्रम १२ एप्रिल २०१९ रोजी हाती घेतला. हा अभ्यास उपक्रम विद्यार्थी- विद्यार्थिनींना अभ्यासाप्रती अती ओढ निर्माण करणारा आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालय सातत्याने विद्यार्थी हिताचे उपक्रम राबवते. हा अठरा तास अभ्यास उपक्रम देखील स्तुत्य असून, विद्यार्थ्यांना थोर विव्दानांप्रती आदरभाव, तसेच प्रेरणा घेण्यास भाग पाडणारा आहे.

या अभ्यास उपक्रमास माझ्या मनातून शुभेच्छा !

आपला,
संतोष शिंदे,
पत्रकार : दै. पुण्यनगरी,
लातूर, मो. ९९७५५९५३३७

(signature) १२.४.१९.

अभिप्राय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंती निमित्त आपण आपल्या महाविद्यालयात अठरा तास अभ्यास एकच ध्यास हा स्तुत्य उपक्रम राबवून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यात महत्वाचा ठरेल. तसेच असे उपक्रम दयानंद वाणिज्य महाविद्यालय सतत आयोजित करते. या अभ्यासाचा निश्चित फायदा विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात नक्की होईल, याबद्दल तिळमात्र शंका नाही.

अशा उपक्रमास मनापासून खूप- खूप शुभेच्छा !

आपला.
क्षिरसागर निलेश
मो. ९५०३६८०७९२

(signature) १२/०४/१९

Ekach Dhyas, Athra tas abhyas !

The event is Very Motivating to Students. Two Objectives are accomplished: 1) Respect of Dr. Ambedkar's great Life & work 2) Life Long learning being the aspiration for Life.

Very innovative and inspiring event, Best wishes.

(signature)
(Dr. Ramesh S. Joshi)

प्रति, दि. १२/४/२०१९
मा. प्राचार्य
दयानंद वाणिज्य महा, लातूर.

'एकच ध्यास १८ तास अभ्यास' या उपक्रमात महाविद्यालयातील अभ्यासक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सर्वच विद्यार्थी पहाटे ५ ते रात्री ११ पर्यंत च्या अभिनव उपक्रमातून नवी पिढी तयार करण्याचे ऐतिहासिक काम प्रा. विठ्ठलराव जाधव आणि सहकारी करीत आहेत याचा रास्त अभिमान वाटतो.

डॉ. शिवाजी जवळगे
दयानंद कला महा
लातूर. ९४२२०६२९०[illegible]

दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचलित,

# दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

ग्रंथालय विभाग आयोजित

161

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंती व ज्ञानदिनाच्या निमित्ताने १२ एप्रिल २०१९ रोजी ''एकत्र ध्यास १८ तास अभ्यास'' या अभिनव उपक्रमातील पहाटे ०५:०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत 'सलग अभ्यास' करणाऱ्या सहभागी विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

## // अभिप्राय //

१) या उपक्रमातून तुम्हास कोणती प्रेरणा मिळाली-- I Improve a capacity of the study/ Reading streinght.

२) या उपक्रमात आपण कोणता अभ्यास केला ?---- I can study in different diffrent subject (for example SET - NET, university exam study etc.) and also Read the Books of Dr. Babasaheb Ambedkar biography.

३) हा उपक्रम कायमस्वरूपी चालू ठेवावा का? ------ yes, in daily, Monthly basis.

४) उपक्रमातील चहा, नाष्टा व भोजनाची व्यवस्था कशी वाटली ?---- Very nice, I always forget the Daily Meal of my Home.

५) उपक्रमाबाबत आपला थोडक्यात अभिप्राय ------ on this study schedule when Dr. Babasaheb Ambedkar could Achive his dreams despite Adverse social condition, why can't we. He is a my Role Model. This participation will motivate us to study more.

स्वाक्षरी-- Pathan पठाण अमीर पाचुलाल

नाव -- Pathan Amir pachulal

वर्ग----- M.com SY.

तुकडी -- M.com SY(B) रोल नं. -- 99266

मो.नं. १. ------ 9970515352

मोबाईल नं. २. --- 9970515352

ई-मेल :-- Amir.app6295@gmail.com

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## Continuous 18 Hour Study - 2018-19

सकाळ

सकाळ

# एकच ध्यास, १८ तास अभ्यास

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात उपक्रम

**लातूर, ता. १२ (बातमीदार) :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने शुक्रवारी (ता. १२) विद्यार्थ्यांनी सलग १८ तास अभ्यास करून महामानवास ज्ञानरूपी अभिवादन केले.

एकच ध्यास, १८ तास अभ्यास या अभिनव उपक्रमात ६० मुले व ५१ मुली अशा १११ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आपल्या अभ्यासक्रमासह विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील विविध पुस्तकांचे वाचन केले. यामध्ये वाणिज्य विद्याशाखेच्या पुस्तकांबरोबर शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, स्वामी रामानंद तीर्थ अशा विविध महापुरुषांच्या जीवनावर आधारित पुस्तके तसेच कथा कादंबऱ्यांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. प्रारंभी महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी ग्रंथालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. **पान ३ वर »**

Aurangabad, Latur-Today
13/04/2019 Page No. 1



लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात आयोजित एकच ध्यास १८ तास अभ्यास उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी.

### एकच ध्यास, १८ तास अभ्यास

» पान १ वरून

या वेळी डॉ. अशोक शेलगेनवार, वाणिज्य विभागप्रमुख आर. एस. पवार, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. ब्रिजमोहन दायमा, प्रा. विष्णुपंत वेदे, डॉ. एम. डी. उमाटे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. सुभाष मोरे, अधीक्षक आर. डी. कुरे, लक्ष्मीकांत वाघ, एल. टी. शेटिया, तानाजी सुतार, शिवरानी दुबे, कलीम शेख, बाळू चौगुले, सोमनाथ घोडके उपस्थित होते.

Deccan Education Society's
Fergusson College (Autonomous), Pune
Admission 2019-20
Please read the Admission Procedure for M.Sc. Programmes on College Website carefully before applying for Entrance Test. The Admission related detailed information, Date of Entrance Examination, programme brochures and applications forms are available on the College Website : www.fergusson.edu
Master of Science (M.Sc.) in :-
M.Sc. Biotechnology
M.Sc. Computer Science
M.Sc. Computer Applications (C.A.)
M.Sc. Industrial Mathematics with Computer Application (I.M.C.A.)
For above Courses Admissions will be done through Entrance Test only
Application Forms & Notices are available on website – www.fergusson.edu
-Principal

Aurangabad, Latur-Today
13/04/2019 Page No. 3



**लातूर/प्रतिनिधी**

येथील विद्यार्थीप्रिय दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने १४ एप्रिल २०१९ रोजी महामानव तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सतत १८ तास अभ्यास हा उपक्रम १२ एप्रिल २०१९ रोजी पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत राबविला. या उपक्रमात ६० विद्यार्थी आणि ५१ विद्यार्थिनी अशा एकूण १११ जणांनी सहभाग नोंदवला. महामानवास ज्ञानरूपी मानवंदना देण्याचा हा उपक्रम कौतुकास पात्र ठरला.

'एकच ध्यास, १८ तास अभ्यास' या विचाराने प्रेरित झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सुसज्ज ग्रंथालयाच्या इमारतीतील ५८ हजार ८६० पुस्तकांच्या सान्निध्यात घालविले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांतर्गत अभ्यासक्रमासह ग्रंथालयातील विविध पुस्तकांचे वाचन, मनन केले. ग्रंथालयात वाणिज्य विद्याशाखेच्या पुस्तकांबरोबर छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, स्वामी रामानंद तीर्थ, अशा विविध महापुरुषांच्या जीवनावर आधारित पुस्तके तसेच कथा, कादंबऱ्यांचे वाचन करीत वाचन संस्कृतीला आणखी चकचकीत करण्याचा प्रयत्न केला. उपक्रमाच्या प्रारंभी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगनवार, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. आर. एस. पवार, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. ब्रिजमोहन दायमा, प्रा. विष्णुपंत वेदे, डॉ. एम. डी. उमाटे, उपक्रमाचे आयोजक ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. सुभाष मोरे, कार्यालयीन अधीक्षक आर. डी. कुरे यांच्यासह वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथालयातील कर्मचारी लक्ष्मीकांत वाघ, एल. टी. शेटिया, तानाजी सुतार, शिवराणी दुबे, बाळू चौगुले, कलिम शेख यांनी प्रयत्न केले. या उपक्रमास शुक्रवारी दिवसभरात शहरातील प्राध्यापक, पालक व विद्यार्थ्यांनी भेट देऊन प्रतिक्रिया नोंदवल्या, अशी माहिती ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांनी दिली.

### उपक्रमाबद्दल विद्यार्थी म्हणाले...

दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी १८ तास अभ्यास हा उपक्रम शुक्रवारी पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत आयोजित केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांत अभ्यासाची गोडी, वाचन संस्कृती रूजावी, अभ्यासाव्यतिरिक्त अन्य पुस्तके चाळण्याची एक उत्तम संधी उपलब्ध करून दिली. विद्यार्थी म्हणून आम्ही या उपक्रमाचे स्वागत करतो. पुस्तकांसह अन्य सोयी, सुविधाही महाविद्यालयाने जागेवर उपलब्ध केल्या. पर्यायाने, विद्यार्थ्यांना प्रेरणा, उत्तेजन मिळण्यास मोठा हातभार लागला. असे उपक्रम सातत्याने व्हावेत. सध्या स्पर्धेचे युग आहे. या युगात तग धरून राहायचे असेल तर वाचन आणि अभ्यासाशिवाय पर्याय नाही. हे महाविद्यालयाच्या ग्रंथपाल विभागाने प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केल्याची भावना प्रदीप आडसुळे, आदित्य भोसले, श्रद्धा चन्नुरे, राजश्री चौधरी, सोनाली दंडे या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.